# प्रेस नोट दि. ०७/०७/२०२३

## आय.टी कंपनीत नोकरीस लावण्याचे आमिष दाखवुन लाखो रुपयांची फसवणुक करणाऱ्या ०४ आरोपींना गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड कडुन अटक ६० ते ७० मुला-मुलींना फसवल्याचे उघड

सदर प्रकरणाची सविस्तर हकीकत अशी की, फिर्यादी नामे कमलेश पंढरीनाथ गंगावने, वय-४० वर्षे, रा-११ साई अंगण सोसायटी, तापकिर नगर, काळेवाडी, पुणे व त्यांचे इतर सहकाऱ्यांची वेळोवेळी टेक्नालॉजी एस.ए.पी, एम.एम कंपनी व एम के मॅनेजमेंट सर्व्हिस नावाने जॉबचे ॲड देणाऱ्या कंपनीचे मालक नामे महेशकुमार कोळी, व कंन्सल्टन्शी ओनर कल्पना मारुती बखाळ, सुरज महाले, रा-चंदननगर, पुणे, श्रावण शिंदे, यांनी मिळुन फिर्यादी तसेच त्यांचे इतर साथिदाराना इसम नामे अनुदिप शर्मा पशुपती, याचे ई पॅवेलिन कंपनी, खराडी, पुणे व बेंक्यु सॉफ्टवेअर सिस्टम्स प्राव्हेट लिमिटेड, विमाननगर येथे बनावट आय.टी कंपनी मध्ये नोकरीला लावण्याचे आमिष दाखवुन ६० ते ७० मुला-मुलींची एकुण ५० लाख रुपये फोन पे, गुगल पे व चेक व्दारे वेळोवेळी स्विकारुन अस्तित्व नसलेल्या बनावट कंपनीचे बनावट नेमणुक पत्र (अपॉर्टमेंट लेटर) देवुन आर्थिक फसवणुक व विश्वास घात केल्याने भोसरी पोलीस ठाणे, गु.र.नंबर- ५३६/२०२३ भा.द.वि कलम- ४१९,४२०,४०६,४६५,४६७,४६८,४७१ प्रमाणे गुन्हा नोंद होता. सदरचा प्रकार हा गंभीर स्वरुपाचा असल्याने मा.पोलीस आयुक्त सो, विनयकुमार चौबे साहेब व आम्ही सदरच्या गुन्हयाचा पुढील तपास गुन्हे शाखा युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शंकर आवताडे यांना करण्याचे आदेशित केले होते.

तेव्हा गुन्हे शाखा युनिट-४ चे अधिकारी व अंमलदार यांनी सदर गुन्हयाचा तपास तात्काळ सुरु करुन शिताफीने पिंपरी चिंचवड परिसरातुन आरोपी नामे **१) महेशकुमार हरिचंद्र कोली, वय-३२ वर्षे, रा-५५ सुखनिवास सोसायटी, लडकत पेट्रोलपंपा जवळ, सोमवार पेठ, पुणे २) अनुदिप चंद्रकांत पशुपती ऊर्फ शर्मा, वय-५२ वर्षे, रा-लेन नंबर-१२ श्री राम पी.जी.जवळ, कानदवे नगर, वाघोली, पुणे ३) महिला आरोपी नामे - कल्पना मारुतराव बखाल, वय-३० वर्षे, रा-बाबर सोळंकी रेसिडेन्सी, फ्लॅट नंबर-४०२ ए विंगए दत्त नगर, दिघी पुणे. ४) श्रावण एकनाथ शिंदे, वय-३२ वर्षे, रा- फ्लॅट नंबर-४, लिमकर बिल्डींग, अजमेरा सोसायटी जवळ, तुकाराम नगर, वाघोली, पुणे**. यांना ताब्यात घेवुन अटक करण्यात आली आहे.

सदर आरोपींकडे पोलीस कस्टडी दरम्यान केलेल्या तपासात आरोपी क्र २ याने बनावट कंपनीचे बनावट नेमणुक पत्र (अपॉर्टमेंट लेटर) देवुन तसेच आरोपी क्र १, ३ व ४ यांनी आरोपी नामे अनुदिप शर्मा याची बनावट कंपनी असल्याचे माहित असुनही फिर्यादी तसेच त्यांचे इतर साथिदारांची आय.टी कंपनीत नोकरीला लावतो असे सांगुन लाखो रुपयांची फसवणुक केल्याचे तपासात निष्पन्न झाले असुन दाखल गुन्हयाचा अधिक तपास गुन्हे शाखा युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शंकर आवताडे हे करत आहे.

**अशा प्रकारे वरील आरोपींकडुन नोकरीला लावतो असे सांगुन अधिक कोणाची फसवणुक झालेली असल्यास गुन्हे शाखा युनिट-४ पिंपरी चिंचवड यांना संपर्क करावा.**

-----------------------------------------ooo-----------------------------------------

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. विनयकुमार चौबे सो, सह पोलीस आयुक्त मा. श्री. डॉ. संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. वसंत परदेशी सो, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, स्वप्ना गोरे मॅडम, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे मा. श्री. सतिष माने सो यांचे मार्गदर्शना खालील गुन्हे शाखा, युनिट-४, वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर आवताडे, सहायक पोलीस निरीक्षक सिद्धनाथ बाबर, पोलीस उपनिरीक्षक गणेश रायकर, सहा.पो.उप.नि. नारायण जाधव, संजय गवारे, अदिनाथ मिसाळ, दादा पवार, पोहवा/ प्रविण दळे, रोहिदास आडे, तुषार शेटे, पोना/ वासुदेव मुंडे, सुनिल गुट्टे, सुरेश जायभाये, पोशि/ प्रशांत सैद, धनाजी शिंदे, गोंविद चव्हाण, सुखदेव गावंडे तसेच तांत्रिक विश्लेषण विभाग गुन्हे शाखा चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय तुंगार, स.पो.नि. सागर पानमंद, पोहवा/नागेश माळी, पोशि/पोपट हुलगे यांनी केली आहे.

**(स्वप्ना गोरे)**
पोलीस उप-आयुक्त, गुन्हे
पिंपरी चिंचवड